**L. A. BILL No. XLIV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS, BOOTLEGGERS, DRUG-OFFENDERS, DANGEROUS PERSONS, VIDEO PIRATES, SAND SMUGGLERS AND PERSONS ENGAGED IN BLACK-MARKETING OF ESSENTIAL COMMODITIES ACT, 1981.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४.**

**महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९८१ चा महा. ५५.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या पूर्ण नावाची सुधारणा.

१९८१ चा महा. ५५.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या पूर्ण नावामधील, "वाळू तस्कर" या मजकूरानंतर, ",खत अपराधी, कीटकनाशक अपराधी, बियाणे अपराधी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, खंड (अ) मधील,—

(१) (अ) उप-खंड (चार-ब) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(चार-क) खत अपराध्याच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होईल, किंवा प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल असा खत अपराधी म्हणून जेव्हा ती, तिच्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करीत असेल, किंवा ते करण्याची तयारी करीत असेल तेव्हा, असे कोणतेही कृत्य ;

(चार-ड) कीटकनाशक अपराध्याच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होईल, किंवा प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल असा कीटकनाशक अपराधी म्हणून जेव्हा ती, तिच्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करीत असेल, किंवा ते करण्याची तयारी करीत असेल तेव्हा, असे कोणतेही कृत्य ;

(चार-ई) बियाणे अपराध्याच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होईल, किंवा प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल असा बियाणे अपराधी म्हणून जेव्हा ती, तिच्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करीत असेल, किंवा ते करण्याची तयारी करीत असेल तेंव्हा, असे कोणतेही कृत्य ; " ;

(ब) स्पष्टीकरणामध्ये, " अंतिमतः महागाई वाढत असेल " या मजकुरानंतर, " किंवा अप्रमाणित खते, गैरछापाची कीटकनाशके अथवा गैरछापाचे बियाणे किंवा भेसळयुक्त बियाणे यांचे उत्पादन, साठवण, विक्री किंवा वितरण करण्यात येत असेल " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(२) खंड (ई-२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (ई-३) " खत अपराधी " याचा अर्थ, जी व्यक्ती, अप्रमाणित खतांचे, मग ते रासायनिक खत असो किंवा जैव-खत असो, उत्पादन करीत असेल, त्यांचा साठा करीत असेल, त्यांची विक्री करीत असेल किंवा ते वितरित करीत असेल, अथवा खते (असेंद्रिय, सेंद्रिय किंवा मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ किंवा अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून, कोणतीही गोष्ट करीत असेल किंवा भारतीय दंड संहिता याच्या कलम ४२० अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध, जी, स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत जाणीवपूर्वक करीत असेल किंवा तो करण्याचा प्रयत्न करीत असेल अथवा असे अपराध करण्यास, इतर कोणत्याही रीतीने अपप्रेरणा देत असेल ती व्यक्ती, असा आहे ;

१९५५ चा १०.

१८६० चा ४५.

(ई-४) " कीटकनाशक अपराधी " याचा अर्थ, जी व्यक्ती, गैरछापाची कीटकनाशके उत्पादन करीत असेल, त्यांचा साठा करीत असेल, त्यांची विक्री करीत असेल किंवा ते वितरित करीत असेल अथवा कीटकनाशके अधिनियम, १९६८ याच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, काढलेल्या अधिसूचना व आदेश यांचे उल्लंघन करून, कोणतीही गोष्ट करीत असेल, किंवा भारतीय दंड संहिता यांच्या कलम ४२० अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध, जी, स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत जाणीवपूर्वक करीत असेल, किंवा तो करण्याचा प्रयत्न करीत असेल अथवा असे अपराध करण्यास, इतर कोणत्याही रीतीने अपप्रेरणा देत असेल ती व्यक्ती, असा आहे ;

१९६८ चा ४६.

१८६० चा ४५.

(ई-५) " बियाणे अपराधी " याचा अर्थ, जी व्यक्ती, कोणत्याही गैरछापाच्या बियाण्यांचे किंवा मूळ बियाण्यांमध्ये निकृष्ट किंवा दुय्यम दर्जाची बियाणे मिसळून भेसळ केलेल्या बियाण्यांचे उत्पादन करीत असेल, त्यांचा साठा करीत असेल, त्याची विक्री करीत असेल किंवा ते वितरित करीत असेल अथवा बियाणे अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेल्या नियमांचे, काढलेल्या

१९६६ चा ५४.

१८६० चा ४५. अधिसूचनेचे व आदेशांचे उल्लंघन करून, कोणतीही गोष्ट करीत असेल, किंवा भारतीय दंड संहिता याच्या कलम ४२० अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध, जी, स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत जाणीवपूर्वक करीत असेल किंवा तो करण्याचा प्रयत्न करीत असेल अथवा असे अपराध करण्यास, इतर कोणत्याही रीतीने अपप्रेरणा देत असेल ती व्यक्ती, असा आहे ;".

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये, खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईलः- सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १७ ची सुधारणा.

" (ई) महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२३ चा महा. ...... २०२३ याच्या प्रारंभास किंवा त्यानंतर, कोणताही खत अपराधी, कीटकनाशक अपराधी व बियाणे अपराधी, यांच्या बाबतीत.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः— सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ यामध्ये कलम १७ब समाविष्ट करणे.

" **१७ब.** महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) २०२३ चा महा. ...... अधिनियम, २०२३ याच्या प्रारंभास किंवा त्यानंतर, राज्य शासनाला किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याला, अप्रमाणित खतांचे, गैरछापाच्या कीटकनाशकांचे अथवा गैरछापाच्या बियाण्यांचे किंवा भेसळयुक्त बियाण्यांचे उत्पादन, साठा, विक्री किंवा वितरण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, काळ्या बाजारास प्रतिबंध १९८० चा ७. आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अधिनियम, १९८० अन्वये स्थानबद्धता आदेश काढता येणार नाही. ".

अप्रमाणित खतांचे, गैरछापाच्या कीटकनाशकांचे अथवा गैरछापाच्या बियाण्यांचे किंवा भेसळयुक्त बियाण्यांचे उत्पादन, साठा, विक्री किंवा वितरण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या विरुद्धचा स्थानबद्धतेचा आदेश, काळ्या बाजारास प्रतिबंध आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अधिनियम, १९८० अन्वये नव्हे तर, या अधिनियमान्वये काढणे.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५५) यामध्ये, झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरणाऱ्या विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी, त्यांच्या प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद केली आहे.

२. खत अपराधी, कीटकनाशक अपराधी व बियाणे अपराधी, अप्रमाणित खतांचे,—मग ते रासायनिक खत असो किंवा जैव खत असो, गैरछापाच्या कीटकनाशकांचे आणि गैरछापाच्या बियाण्यांचे किंवा मूळ बियाण्यांमध्ये निकृष्ट किंवा दुय्यम दर्जाची बियाणे मिसळून भेसळ केलेल्या बियाण्यांचे उत्पादन करीत आहेत, त्यांचा साठा करीत आहेत, त्यांची विक्री करीत आहेत किंवा त्यांचे वितरण करीत आहेत असे निदर्शनास आले असून, त्यामुळे अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०), बियाणे अधिनियम, १९६६ (१९६६ चा ५४) व कीटकनाशके अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४६) यांच्या तरतुदींचे उल्लंघन होत आहे. अशी अप्रमाणित खते, गैरछापाची कीटकनाशके आणि गैरछापाची बियाणे किंवा भेसळयुक्त बियाणे यांच्या परिणामी, कृषी उत्पादन घटते व पिके विफल होतात, त्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या मुख्य साधनास बाधा पोहोचते.

३. म्हणून, अप्रमाणित खते, गैरछापांची कीटकनाशके व गैरछापाची बियाणे किंवा भेसळयुक्त बियाणे यांचे उत्पादन करणाऱ्या, त्यांचा साठा करणाऱ्या, त्यांची विक्री करणाऱ्या, व त्यांचे वितरण करणाऱ्या व्यक्तींच्या अशा कृत्यांना, पायबंद घालणे आवश्यक आहे. या परिस्थितीत, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी अशा व्यक्तींच्या प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या तरतुदी करणे शक्य व्हावे म्हणून, अशी कृत्ये करीत असलेले असे अपराधी, उक्त अधिनियमाच्या कक्षेत आणणे इष्ट आहे असे शासनास वाटते. त्या प्रयोजनासाठी, उक्त अधिनियमांची कलमे २ व १७ यात सुयोग्य सुधारणा करण्याचे व कलम १७ब समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२३.

**देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.

**सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ४४— महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ स्पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करण्याऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ स्पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ यातील उतारे.)**

**(सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५.)**

महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ स्पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१. पूर्ण नाव.

१. ** ** **

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,- व्याख्या.

(क) ‘ सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरेल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य ’ याचा अर्थ,-

(एक) झोपडपट्टीगुंडाच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल अथवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे, झोपडपट्टीगुंड म्हणून तो करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य ;

(दोन) हातभट्टीवाल्याच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल अथवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे, हातभट्टीवाला म्हणून तो करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य ;

(तीन) औषधिद्रव्यविषयक गुन्हेगाराच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल अथवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार म्हणून तो, करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशी कृत्यांपैकी कोणतेही कृत्य, असा आहे ;

(चार) धोकादायक व्यक्तींच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल अथवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे, धोकादायक व्यक्ती म्हणून, ती करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य ;

(चार-अ) वाळू तस्करांच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल अथवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे, वाळू तस्कर म्हणून तो करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य ;

(चार-ब) अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल अथवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे, अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणारी व्यक्ती म्हणून ती करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य ;

(पाच) दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल किंवा बाधा पोहचण्याचा संभव असेल असे दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती म्हणून ती करीत असेल किंवा करण्याच्या तयारीत असेल अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य.

**स्पष्टीकरण.—** या खंड (क) च्या प्रयोजनार्थ, जर या खंडात निर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही कृत्यामुळे इतर गोष्टींबरोबरच प्रत्यक्षपणे या अप्रत्यक्षपणे सर्वसाधारण जनतेची किंवा त्यातील काही घटकांची कोणतीही हानी होत असेल किंवा ती होण्याचा संभव असेल किंवा जनतेला धोका निर्माण होत असेल किंवा धोका होण्याचा संभव असेल किंवा जनतेत असुरक्षिततेची भावना निर्माण होत असेल किंवा अशी भावना निर्माण होण्याचा संभव असेल किंवा जीविताला या आरोग्याला गंभीर किंवा विस्तृत प्रमाणावर धोका निर्माण होत असेल किंवा असा धोका निर्माण होण्याचा संभव असेल किंवा संगीत कलाकृतीच्या किंवा चित्रपट कलाकृतीच्या विनापरवाना प्रती काढून आणि त्यांचे वितरण करून जनजीवनात अस्वस्थता निर्माण करीत असेल व त्यामुळे प्रशासनावरील विश्वास गमावला जात असेल, किंवा अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करून सार्वजनिक सुरक्षितता व शांततेत अडथळा किंवा दैनंदिन जनजीवनात अस्वस्थता निर्माण करीत असेल, व त्यामुळे अशा वस्तूंचा पुरवठा करताना कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असेल आणि अत्यावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ होऊन अंतिमतः महागाई वाढत असेल तर, सार्वजनिक सुरक्षिततेला बाधा पोहचली आहे अथवा बाधा पोहचण्याचा संभव आहे असे समजण्यात येईल.

(ख) ते (छ)          *          *          *

**३.** ते **१८.**          *          *          *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४]**

**[महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई